RNI No. MAHBIL /2009/36619

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक—कोकण विभागीय पुरवणी

वर्ष १२, अंक ६७(२)] गुरुवार, ऑगस्ट १३, २०२६/श्रावण २२, शके १९४८ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ११.००

असाधारण क्रमांक १०२

**प्राधिकृत प्रकाशन**

### नगरविकास विभाग

४ था मजला, मुख्य इमारत, मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २५ जून २०२६.

### अधिसूचना

**वाचा :** शासन अधिसूचना क्र.टिपीएस-१२९३/३२/प्र.क्र.८/९३/ नवि-१२, दि.२४.०५.१९९३.

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६.**

क्रमांक टिपीएस-१८२६/४४५/प्र.क्र.८१/२०२६/१२४-फ(२)/नवि-१३.—ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त अधिनियम" असा करण्यात आला आहे) मधील कलम १२४ अ मधील तरतुदींनुसार कोणत्याही जमिनीचा किंवा इमारतीचा वापर सुरू करण्यावर किंवा तिच्या वापरात बदल करण्यावर, किंवा उक्त अधिनियमान्वये ज्यासाठी परवानगी आवश्यक आहे अशा कोणत्याही जमिनीचा किंवा इमारतीचा विकास करण्याकरिता या प्रकरणाच्या तरतुदींद्वारे किंवा त्याअन्वये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या दराने विकास शुल्क आकारण्याचा अधिकार संबंधित प्राधिकरणास त्याच्या अधिकार क्षेत्रातील भागात प्रदान करण्यात आला आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम १२४ फ मधील उप कलम (२) मधील तरतुदींनुसार वखार किंवा गोदामासाठी किंवा कोणत्याही शैक्षणिक संस्था, वैद्यकीय संस्था किंवा धर्मादाय संस्थेच्या प्रस्तावित असलेल्या कोणत्याही जमिनीचा किंवा इमारतीचा वापर सुरू करण्यासाठी किंवा वापरात बदल करण्यासाठी किंवा कोणत्याही जमिनीच्या किंवा इमारतीचा विकास करण्यासाठी देय असलेले विकास शुल्क भरण्यातून अंशतः सवलत देण्याचा अधिकार राज्य शासनास प्रदान करण्यात आला आहे ;

आणि ज्याअर्थी, शासन नगरविकास विभागाकडील अधिसूचना क्र. टीपीएस/१२९३/३२/प्र.क्र.८/९३/ नवि-१२, दि.२४.०५.१९९३ अन्वये, उक्त अधिनियमाच्या कलम १२४ फ च्या उप कलम (२) मधील तरतुदींनुसार कोणत्याही शैक्षणिक संस्था, वैद्यकीय संस्था किंवा धर्मादाय संस्थेसाठी प्रस्तावित असलेल्या कोणत्याही जमिनीचा किंवा इमारतीचा वापर सुरू करण्यासाठी किंवा वापरात बदल करण्यासाठी किंवा कोणत्याही जमिनीचा किंवा इमारतीचा विकास करण्यासाठी देय असलेले विकास शुल्क भरण्यातून अंशतः सवलत देण्यात आलेली आहे ;

आणि ज्याअर्थी, राज्यातील सर्व नागरिकांना सुलभ, परवडणाऱ्या व दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी आणि रुग्णालये व वैद्यकीय सेवांच्या विकासास प्रोत्साहन देण्यासाठी, राज्यातील नोंदणीकृत सार्वजनिक धर्मादाय विश्वस्त संस्थांच्या / न्यासांच्या ( Public Charitable Trusts ) मालकीच्या वैद्यकीय संस्थांच्या विकास प्रस्तावांमध्ये विकास शुल्कात अंशतः सवलत देणे आवश्यक आहे. असे राज्य शासनाचे मत झाले आहे.

त्याअर्थी, आता, उक्त अधिनियमाच्या कलम १२४ फ च्या उप कलम ( २ ) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन याद्वारे राज्यातील नोंदणीकृत सार्वजनिक धर्मादाय विश्वस्त संस्थांच्या / न्यासांच्या मालकीच्या वैद्यकीय संस्थांच्या विकास प्रस्तावांसाठी देय असलेले विकास शुल्क भरण्यातून, खाली जोडलेल्या परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या मर्यादेपर्यंत आणि खालील अटीस अधीन राहून सूट देत आहे :—

**परिशिष्ट**

| अ. क्र. | तपशील / बाब | सवलतीची मर्यादा |
|---|---|---|
| १. | राज्यातील नोंदणीकृत सार्वजनिक धर्मादाय विश्वस्त संस्थांच्या / न्यासांच्या (Public Charitable Trust) मालकीच्या वैद्यकीय संस्थांचे विकास प्रस्ताव | ५०% |

**अट :-** राज्यातील नियोजन प्राधिकरणे यांनी उक्त प्रयोजनाकरिता विकास शुल्कामध्ये अंशतः सूट देण्याबाबतच्या प्रस्तावाची काटेकोरपणे छाननी करावी आणि सदर विकास शुल्काच्या भरण्यातून अंशतः सूट मिळण्याबाबत मागणी करणारी संस्था नोंदणीकृत सार्वजनिक धर्मादाय विश्वस्त संस्थांच्या / न्यासांच्या ( Public Charitable Trust ) मालकीची असल्याची व सदर संस्था ही, मुंबई सार्वजनिक विश्वस्त संस्था अधिनियम, १९५० अंतर्गत नोंदणीकृत असल्याबाबत खातरजमा करावी.

सदरची अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या **राजपत्रात** ( *Gazette* ) प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून लागू होईल.

सदरची अधिसूचना शासनाचे संकेतस्थळ *www.maharashtra.gov.in* ( कायदे / नियम ) वर उपलब्ध राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**प्रणव कर्पे,**
शासनाचे उप सचिव.

## URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, Dated 25th June 2026

*NOTIFICATION*

*Read :-* Government Notification No.TPS-1293/32/CR-8/93/UD-12, Dt. 24/05/1993.

THE MAHARASHTRA REGIONAL & TOWN PLANNING ACT, 1966.

No.TPS-1826/445/CR.No.81/2026/124-F(2)/UD-13.—Whereas, Section 124A empowers the respective authorities within the area of its jurisdiction to levy development charge on the institution of use or change of use of any land or building or development of any land or building for which permission is required under the provisions of Maharashtra Regional and Town Planning, Act, 1966 (hereinafter referred to as "the said Act") at the rates specified by or under the provision of the said Act ;

And whereas, sub-section (*2*) of Section 124F of the said Act empowers State Government to exempt partially from the payment of development charge payable on the institution of use or change of use of any land or building or development of any land or building which is proposed for warehouse or godown or by any educational institution, medical institution or charitable institution under the provisions of the said Act ;

And whereas, the State Government in Urban Development Department *vide* Notification No. TPS/1293/32/CR-8/93/UD-12, dt. 24/05/1993 has partially exempted the payment of development charge payable on the institution of use or change of use of any land or building or development of any land or building proposed for any educational institution, medical institution or charitable institution under the provision of sub-section (*2*) of Section 124F of the said Act ;

And whereas, the State Government is of the opinion that for providing accessible, affordable, and quality healthcare services to all citizens and to encourage the development of the Hospitals and Medical Services in State, it is necessary to grant some concession in Development Charges for the development proposals of Medical Institutions owned by registered Public Charitable Trusts in the State.

Now, therefore, in exercise of its power under sub-section (*2*) of Section 124F of the said Act, the Government of Maharashtra hereby partially exempts from the payment of development charges payable for the development proposals of Medical Institutions owned by registered Public Charitable Trusts in the State to the extent in the schedule appended below and subject to following conditions :—

*SCHEDULE*

| Sr. No. | Particulars | Extent of Exemption |
|---|---|---|
| 1. | Development proposals of Medical Institutions owned by registered Public Charitable Trusts in the State. | 50% |

**Condition :** The Planning Authorities shall scrupulously scrutinise the case for granting partial exemptions and ensuring that the medical institution claiming partial exemptions in the development charges is owned by registered Public Charitable Trusts and the said Trust is registered under Bombay Public Trust Act, 1950.

The above Notification shall have effect on the date of publication of this Notification in the *Maharashtra Government Gazette*.

This Notification shall also be made available on Government website-*www.maharashtra.gov.in* (कायदे व नियम).

By order and in the name of the Governor of Maharashtra,

PRANAV KARPE,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR SMT. MANISHA KUMBHAR, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR.